# जीवंत देवाचा शिक्का

ही विशेष प्रार्थना देवपित्याची भेट आहे आणि भविष्यवाणी ”मारिया दिव्य दया”, हिला देवाच्या सर्व लेकरांच्या संरक्षणासाठी दिलेली आहे. हा संदेश ३४७ असून तो तिला २० फेब्रुवारी २०१२ ला मिळालेला आहे.




जे सर्व ह्या शिक्क्याचा स्वीकार करतील, त्या प्रत्येकाला व त्यांच्या कुटुंबियाना ख्रिस्ताच्या पुनरागमना पर्यंत संरक्षण मिळेल.

आता उठा आणि माझा शिक्का, जिवंत देवाच्या शिक्क्याचा स्वीकार करा. ही धर्मयुद्ध प्रार्थना (३३) माझा शिक्का कबूल करण्यासाठी म्हणा आणि हा शिक्का प्रेमाने, आनंदाने व कृतज्ञतेने स्वीकार करा.

हे माझ्या परमेश्वरा, माझ्या प्रेमळ पित्या!

संरक्षणाचा तुझा दैवी शिक्का मी प्रेमाने व कृतज्ञतेने स्वीकारत आहे. तुझं देवपण अनंतकाळ माझ्या शरीर व आत्म्यात वास करणार आहे. मी तुला शरण येऊन नम्रतेने धन्यवाद देतो आणि माझ्या प्रिय पित्या, तुला मी माझे गहन प्रेम आणि निष्ठा अर्पण करतो. ह्या विशेष शिक्क्यासह माझ्या अणि माझ्या प्रियजनांचे संरक्षण करण्याची विनंती करतो आणि मी प्रतिज्ञा घेतो कि, इथून पुढे मी सदैव माझे जीवन तुझ्या सेवेसाठी अर्पण करतो. प्रिय पित्या! माझे तुमच्यावर प्रेम आहे. प्रिय पित्या, ह्या काळात मी तुझे सांत्वन करतो! मी तुला, तुझ्या प्रिय पुत्राचे शरीर, रक्त, आत्मा आणि दैवीपण सर्व जगाच्या पापांच्या भरपाईसाठी व तुझ्या सर्व लेकरांच्या मुक्तीसाठी अपर्ण करतो.

आमेन.

जा, माझ्या मुलांनो आणि भिऊ नका.
तुमचा प्रिय पिता, ज्याने तुम्हा प्रत्येकाला प्रेमाने निर्माण केले, त्याच्यावर विश्‍वास ठेवा. मी प्रत्येक आत्म्याला जाणतो, तुमचा प्रत्येक भाग मला माहिती आहे. मी प्रत्येकावर एक-सारखेच प्रेम करतो. म्हणून, मला एकही आत्माला गमवायचा नाही, एकही नाही! कृपया दररोज माझ्या दिव्य दयेची ( चापलेट ) प्रार्थना करीत रहा.
ह्या शुद्धीकरणाची गरज एक दिवस तुम्हाला समजेल.

तुमचा प्रेमळ स्वर्गीय पिता
अतिउच्च परमेश्वर